सन २०१७-१८ अखिल भारतीय नागरी सेवा
स्पर्धा आयोजनासाठी निधी वितरण

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : निविप्र ४०१७ /प्र.क्र.१०६(भाग १)/क्रीयुसे -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : ०९ जानेवारी, २०१८.

वाचा

१. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं - २०१७ / प्र.क्र ९४ /अर्थ-३ ,दि.३०.०६.२०१७.
२. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा,पुणे यांचे पत्र क्र.क्रीयुसे/अभानासे/निवि/२०१७-१६/का४/३५१८; दि. १३.०७.२०१७ व दि. ०५.०१.२०१८

प्रस्तावना -

दर वर्षी राष्ट्रीय स्तरावर सुमारे १० खेळांसाठी अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धांचे देशातल्या विविध राज्यात आयोजन करण्यात येते. यापैकी १ (किंवा २) खेळांसाठीच्या स्पर्धांचे आयोजन महाराष्ट्र राज्यात केले जाते. सदर स्पर्धा आयोजनासाठी शासनाच्या वतीने अनुदान देण्यात येते. यास्तव महाराष्ट्र राज्यात सन २०१७-१८ या वर्षासाठीच्या अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेचे आयोजन अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीच्या वितरणास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या वर्षा मध्ये अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेचे आयोजन या योजनेसाठी रु.१४.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित आहे. त्यापैकी रु.०९.८० लक्ष (अक्षरी रुपये नऊ लक्ष ऐंशी हजार फक्त)इतकी रक्कम वितरित करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च “माग्णी क्र. ०३, २२०४-क्रीडा व युवक सेवा- १०४ क्रीडा व खेळ ,०६ अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा (०६) (०५) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेचे आयोजन (२२०४ १९९९) ३१ सहायक अनुदाने या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. वित्त विभागाच्या दि.१८.०४.२०१७ व ३०.०६.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये निधी वितरणाचे अधिकार विभागास आहेत. यापूर्वी वितरीत केलेल्या अनुदानापैकी ७५% पेक्षा अधिक खर्च झाला आहे. ज्या लेखाशिर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे त्या लेखाशिर्षातंर्गत गतवर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५. वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८.०४.२०१७ व दि.३०.०६.२०१७ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त (क्रीडा)यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०९१७२४३१८८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.01.09 17:29:47 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे खाजगी सचिव
२) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६) लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई
७) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
८) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत)
९) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
१०) निवडनस्ती, क्रीयुसे-२